## निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ सहकलम ९४ व १५१ दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत तात्पुरता मनाई हुकुमाच्या आदेशाकरीता केलेला आहे.

२. वादी/अर्जदार क्र. १ व २ यांचे थोडक्यात कथन याप्रमाणे आहे की, वादी क्र. १, २ तसेच प्रतिवादी क्र. १ व २ हे मय्यत महादेव हिंगवे यांची मुले असून प्रतिवादी क्र. ४ ही महादेव हिंगवे यांची मुलगी व प्रतिवादी क्र. ५ ही महादेव यांची विधवा आहे. प्रतिवादी क्र. ३ हे प्रतिवादी क्र. २ विठ्ठल यांचा मुलगा आहे. मय्यत बापू हिंगवे यांनी त्यांची चारही मुले नामदेव, पुंडलिक, रामा व महादेव यांच्यात वडीलोपार्जित मालमत्तेची वाटणी केली. सदर वाटणीत मय्यत महादेव हिंगवे यांना मौजा सेलगाव (लवणे) येथील ९ एकर शेतजमीन वाटणीत मिळाली व मय्यत नामदेव यांना साडेपाच एकर शेतजमीन वाटणीत मिळाली. नामदेव हिंगवे यांनी ती जमीन हरीभाउ पठाळे यांना विक्री केली. परंतु हरीभाउ पठाळे यांना ती साडेपाच एकर शेतजमीन वहीवाटीला परवडत नव्हती म्हणून महादेव हिंगवे यांनी त्यांना वाटणीत मिळालेली ९ एकर शेतजमीनीपैकी साडेसात एकर शेतजमीन हरीभाउ पठाळे यांना दिली व हरीभाउ पठाळेपासून मोबदल्यात साडेपाच एकर शेतजमीन अदलाबदली करुन घेतली. महादेव हिंगवे यांच्याकडे ९ एकर शेतजमीनीपैकी शिल्लक राहिलेल्या शेतजमीनीला शेत क्र. ३९९ व हरीभाउ पठाळे यांच्यापासून बदली करुन घेतलेल्या साडेपाच एकर शेतजमीनीला शेत क्र. ४३२ क्रमांक देण्यात आले. वादी क्र. १ व २ यांना समज आली तेव्हापासून ते महादेव हिंगवे यांच्यासोबत रोजमजुरीचे काम करणे, शेत बटाई मत्याने वाहण्याचे काम व उद्योग करीत होते. वडीलोपार्जित मिळकतीच्या उत्पन्नावर तसेच वादींच्या अंगमेहनतीतून व इतर उद्योगातून कमावलेल्या पैशातून मौजा सेलगाव (लवणे) येथे शेत क्र. ३९४ आणि ४३६/२ या शेतजमीनी महोदव हिंगवे यांच्या नावाने कुटुंबाचे कर्ता असल्यामुळे नाममात्र त्यांच्या नावे एकत्रीत कुटुंबाच्या भल्याकरीता विकत घेतली. दाव्यातील मालमत्तेचा महादेव हिंगवे जिवंत असतांना कधीही वाटणी

झालेली नाही. वादी क्र. १ व २ हे त्यांच्या पत्नीबरोबर काही वर्षापुर्वी त्यांचे कुटुंबापासुन वेगळे राहू लागले. अंदाजे २० ते २१ वर्षापुर्वी मय्यत महादेव हिंगवे यांनी वादी क्र. १ व २ तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यात दावा मिळकतीच्या वहीवाटी संदर्भात कौटुंबिक व्यवस्था तयार करण्यात आली. वादी क्र. १ व २ यांना शेत क्र. ३९९ व शेत क्र. ४३६/२ अर्धे–अर्धे वाहण्यास देण्यात आली. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांना शेत क्र. ४३२ एकत्रीतपणे वाहण्यास देण्यात आली. शेत क्र. ३९४ हे मय्यत महादेव यांना वाहीपेरी करण्याकरीता देण्यात आली. महादेव यांच्या हयातीत वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांना राहती घरे वेगवेगळया मालकी हक्काने करुन देण्यात आली. दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांचे समान प्रमाणात प्रत्येकी १/६ हक्क व हिस्सा आहे. मय्यत महादेव हिंगवे हे त्यांच्या मृत्यूपुर्वी अंथरुणावरच होते. त्यांना दिसत नव्हते, ऐकू येत नव्हते. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी मय्यत महादेव हिंगवे यांच्या अपंगत्वाचा फायदा घेवून दि. २२.११.२०१९ रोजी शेत क्र. ४३२ या वडीलोपार्जित शेतजमीनीचे विभाजन करुन महादेव हिंगवे यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावाने बक्षीसपत्र करुन दिल्याचे खोटेपणाने दर्शविले. त्याचप्रमाणे दि. २२.११.२०१९ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कटकारस्थान करुन खोडसाडपणे दावा मिळकत शेत क्र. ३९९ च्या संदर्भात मृत्यूपत्राचा लेख महादेवराव हिंगवे यांनी केला असे दर्शवून शेत क्र. ३९९ प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावाने करुन दिले असे खोटे मृत्यूपत्र अस्तीत्वात आणले. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी खोडसाडपणे मय्यत महादेवराव हिंगवे यांना कोणतीही समज न देता ती शेत जमीन स्वतःला मिळावी या दुष्ट हेतुने तथाकथीत दस्ताऐवज अस्तीत्वात आणले. दि. २२.११.२०१९ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी महादेवराव हिंगवे यांना वैद्यकीय उपचाराकरीता नेण्याचे सांगुन कारंजा येथे आणुन खोटेपणाने तिनही दस्ताऐवज नोंद करुन घेतले. ते तिनही दस्ताऐवज अवैद्य व बेकायदेशीर आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीस कायदेशीर नोटीस पाठवून बक्षीसपत्र व मृत्यूपत्र खारीज करुन दावा मिळकतीत त्यांचा असलेला समान हक्क व हिस्सा वाटणी व विभागणी करुन द्यावे असे

सांगितले. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना नोटीस प्राप्त होवून सुध्दा वादीची मागणी कबुल केली नाही. त्यामुळे वादींना प्रस्तुतचा दावा दाखल करावा लागला. तथाकथीत बक्षीसपत्र व मृत्यूपत्राच्या आधारावर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी महसुल अभिलेखात त्यांचे स्वतःचे नाव नोंदवू नये म्हणून आक्षेप घेतला. सदर आक्षेपाला न जुमानता महसुल अधिका–याने प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या दबावात बेकायदेशीर नोंद केली. त्या आधारावर प्रतिवादी क्र. १ ते ३ शेत क्र. ४३२ व ३९९ ची बेकायदेशीर विल्हेवाट करण्याच्या तयारीत दिसुन येत आहेत. त्यामुळे प्रथम दर्शनी केस वादीच्या बाजुला आहे. सोयीचे पारडे सुध्दा वादीच्या बाजुने आहे. तात्पुरता मनाई हुकुम पारित न झाल्यास वादीचे अपरिमीत हानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकतीची, दाव्याचा निकाल लागेपर्यंत, विल्हेवाट करु नये किंवा त्रयस्त हक्क निर्माण करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम पारित करण्यात यावा अशी वादींनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादीच्या दाव्याला तसेच तात्पुरता मनाई हुकुमाच्या अर्जाला नि. क्र. १७ अन्वये लेखीजबाब दाखल केला आहे. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे शेत सर्वे क्र. ४३२ व ३९९ हे मय्यत महादेव हिंगवे यांनी स्वकष्टाच्या कमाईतून खरेदी केले होते. त्यामुळे शेत सर्वे क्र. ४३२ व ३९९ बक्षीसपत्राव्दारे व मृत्यूपत्राव्दारे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या नावे करुन दिले आहे. वादी क्र. १ व २ हे मय्यत महादेव हिंगवे व प्रतिवादी यांच्या पासुन वेगळे राहण्यास गेले असता वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे महादेव हिंगवे यांनी वडीलोपार्जित शेतीतून तोंडी वाटणी करुन शेत क्र. ३९४ व ४३६/२ वादी क्र. १ व २ च्या ताब्यात दिली. सदर शेतीची वाहीपेरी करुन वादी क्र. १ व २ त्यांचे कुटुंब चालवित होते. मय्यत महादेव व त्यांची पत्नी सखुबाई ही प्रतिवादी सोबत राहत होती. वडीलोपार्जित शेतजमीनीवर वादींनी तोंडी वाटणी प्रमाणे स्वतःचा हिस्सा वेगळा करुन घेतला असल्यामुळे त्यांना पुन्हा वडीलोपार्जित शेतजमीनीमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार राहिलेला नाही. शेत सर्वे क्र. ४३२ व ३९९ हे मय्यत महादेव हिंगवे यांनी स्वकष्टाच्या कमाईतून खरेदी केले होते. महादेव हिंगवे व त्यांची पत्नी सखुबाई हिंगवे

हे प्रतिवादी क्र. १ व २ सोबत राहत असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांची पुर्ण काळजी घेतली असल्याकारणाने महादेव हिंगवे यांनी शेत सर्वे क्र. ४३२ मधील १.३७ हेक्टर आर ही शेती वामनराव हिंगवे व ०.८३ हेक्टर आर ही शेत जमिन विठ्ठलराव हिंगवे यांच्या नावाने दि. २२.११.२०१९ रोजी बक्षीसपत्राव्दारे करुन दिलेले आहे. त्याचप्रमाणे सर्वे क्र. ३९९ आराजी ०.५३ हेक्टर आर ही शेतजमीन प्रतिवादी क्र. ३ मनोज हिंगवे यांच्या नावाने मृत्युपत्राव्दारे करुन दिले. महसुल अधिका–यांनी सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन बक्षीसपत्र व मृत्युपत्राच्या आधारे महसुल अभिलेखात कायदेशीररित्या फेरफार केली आहे. वादी क्र. १ व २ यांचे नियत खराब झाल्यामुळे त्यांनी जाणुनबुजुन प्रतिवादी क्र. १ व २ यांचा व बहिण पिंगळाबाई हिचा हिस्सा हडप करण्याच्या उद्देशाने खोटे आरोप लावून खोटी नोटीस पाठवून खोटा दावा केला. त्यामुळे वादीचा दावा व अर्ज खारीज करण्यात यावा अशी प्रतिवादीने विनंती केली आहे.

४. वादी तर्फे ॲड. धारस्कर यांनी युक्तीवाद केला आहे. प्रतिवादी तर्फे ॲड. गुरुनासिंघाणी यांनी युक्तीवाद केला आहे. दोन्ही पक्षाचे कथन, अभिलेखावरील दस्ताऐवज तसेच दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकून खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. त्यापुढे खालिल दिलेल्या कारणमिमांसेवरून पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीची प्रथमदर्शनी केस आहे हे वादी सिध्द करतो काय ? | ...होय. |
| २. | सोयीचे पारडे हे वादीच्या बाजुने आहे हे वादी सिध्द करतो काय ? | ... होय. |
| ३. | तात्पुरता मनाई हुकुम पारीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होते काय ? | ... होय. |

| | | |
|---|---|---|
| ४. | कोणता आदेश ? | .... अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ ते ३ करिता-

५. वादीच्या कथनाप्रमाणे दाव्यातील मालमत्ता शेत सर्वे क्र. ३९९ व ४३२ ही शेत जमीन मय्यत महादेव यांना वाटणीत मिळालेले ९ एकर जमीनींपैकी शिल्लक असलेली जमीन व मिळालेली ९ एकर जमीनींपैकी साडेसात एकर जमीन हरीभाउ पठाळे यांना देवून त्यांच्यापासुन मोबदल्यात मिळालेली साडेपाच एकर शेतजमीन आहे. त्याचप्रमाणे शेत सर्वे क्र. ३९४ व ४३६/२ ही शेतजमीन वडीलोपार्जित शेतजमीनीच्या उत्पन्नापासुन खरेदी केलेले आहेत. त्यामुळे ते सुध्दा वडीलोपार्जित शेतजमीन आहे. मय्यत महादेव यांनी सदर वडीलोपार्जित शेतजमीन प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या नावे बक्षीस पत्र व प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावे मृत्यूपत्र करुन देण्याचा कोणताही अधिकार नाही. तसेच सदर वडीलोपार्जित शेतजमीनीत वादीचा १/६ हिस्सा आहे. याउलट प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे शेत सर्वे क्र. ४३२ व ३९९ हे मय्यत महादेव हिंगवे यांच्या स्वकष्टाच्या कमाईतुन खरेदी केलेले आहेत. त्यामुळे त्या शेतजमीनीचे बक्षीस पत्र व मृत्यूपत्र करुन देण्याचा मय्यत महादेव हिंगवे यांचा अधिकार होता व त्यांनी होशोहवाशात प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या हक्कात बक्षीस पत्र व मृत्यूपत्र करुन दिलेले आहे व शेत सर्वे क्र. ३९४ व ४३६/२ ही शेत जमीन वडीलोपार्जित शेतजमीन आहे. सदर वडीलोपार्जित शेतजमीनीतून तोंडी वाटणी करुन दोन्ही शेत वादी क्र. १ व २ यांच्या ताब्यात दिलेले आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा वडीलोपार्जित शेतजमीनीमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार नाही.

६. वादीने त्यांचा दावा सिध्द करण्याकरीता भुमापन क्र. ४३२, ३९९, ३९४ व ४३६/२ या शेतजमीनीचे सातबारे दाखल केलेले आहे ज्यावर मय्यत बापु हिंगवे यांच्या नावाची नोंद दिसुन येते. वादींने वादातील शेतजमीनीचा रिनंबरींग पर्चा दाखल केला आहे. तसेच मय्यत महादेव हिंगवे यांनी प्रतिवादी क्र. १ व वामन हिंगवे तसेच प्रतिवादी क्र. २

विठ्ठलराव हिंगवे यांनी दि. २२.११.२०१९ रोजी करुन दिलेले बक्षीसपत्राची प्रमाणित सत्यप्रत दाखल केली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ३ मनोज विठ्ठलराव हिंगवे यांच्या हक्कात मय्यत महादेव हिंगवे यांनी लिहून दिलेल्या मृत्यूपत्राचा लेख ची प्रमाणित सत्यप्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी तथाकथीत बक्षीसपत्र व मृत्यूपत्र खारीज करुन वादींना हिस्सा वाटणी करुन द्यावे असा दि. २७.०१.२०२० रोजी पाठविलेल्या नोटीसाची स्थळप्रत दाखल केलेली आहे. सदर नोटीसाची पोस्ट रिसीप्ट व पोहोच पावत्या दाखल केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे नि. क्र. २२ व २६ सह अभिलेख अधिकार पंजीची प्रत दाखल केलेली आहे.

७. याउलट प्रतिवादी यांनी शेत सर्वे क्र. ४३२ चा सातबारा उता-याची प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता विठ्ठलराव हिंगवे यांच्या नावाने ०.८३ हेक्टर आर व वामन महादेवराव हिंगवे यांच्या नावाने १.३७ हेक्टर आर जमीन असल्याचे दिसुन येते. प्रतिवादींनी माननीय नायब तहसिलदार, कारंजा, यांचा दि. ०१.०७.२०२० रोजीच्या आदेशाची प्रत दाखल केली आहे. सदर आदेशान्वये माननीय नायब तहसिलदार यांनी आदेश पारित करुन शेत सर्वे क्र. ३९९ या शेतीवरील मय्यत महादेव हिंगवे यांचे नाव कमी करुन मनोज विठ्ठलराव हिंगवे यांचे नाव महसुल रेकॉर्डला चढविण्याचा आदेश दिले असल्याचे दिसुन येते. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दि. २४.०२.२०२० रोजी वादींच्या नोटीसाला दिलेले उत्तर नोटीसाची प्रत दाखल केली आहे. पुंडलिकराव बापूजी हिंगवे यांनी महादेव हिंगवे यांना दि. ०६.०४.१९६४ रोजी शेत सर्वे क्र. २२९/१ आराजी २.०० हेक्टर आर तसेच दि. २०.०४.१९७६ रोजी सर्वे क्र. २२९/१ आराजी ०.८७ हेक्टर आर शेतजमीन विक्री केल्याबाबतची विक्रीपत्राची प्रत दाखल केली आहे. त्याचप्रमाणे हरीभाउ पठाळे व मधुकरराव पठाळे यांच्याकडून मय्यत महादेव हिंगवे यांनी शेत सर्वे क्र. २१३/१ व २२९/२ आराजी ५.३५ या शेत जमीनीची दि. ०८.०६.१९६७ रोजीच्या विक्रीपत्राची प्रत दाखल केली आहे.

८. वादीच्या कथनाप्रमाणे वादातील शेतजमीनी हया वडीलोपार्जित असल्यामुळे मय्यत महादेव हिंगवे यांना शेत सर्वे क्र. ४३२ व ३९९ शेतजमीनीची बक्षीसपत्र व मृत्यूपत्र

करुन देण्याचा कोणताही अधिकार नव्हता. याउलट प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे शेत सर्वे क्र. ४३२ व ३९९ हया मय्यत महादेव हिंगवे यांच्या स्वकष्टाच्या कमाईतून खरेदी केलेली मालमत्ता आहे.

९. वादीने नि. क्र. २६ सह दाखल केलेल्या अधिकार अभिलेख पंजीचे अवलोकन केले असता शेत सर्वे क्र. २०९, २१० एकुण आराजी २६.३० व सर्वे क्र. २२९/१ आराजी ८.५९ यावर पुंडलिक, महादेव, रामा यांचे नाव लिहिले असून त्यांना वारस हक्काने सदरची शेतजमीन मिळाली असल्याचे नमुद आहे. पुढे नि. क्र. २२ सह दाखल केलेल्या अधिकार अभिलेख पंजीचे अवलोकन केले असता पुंडलिक, महादेव, रामा यांच्यामध्ये सन १९५५ मध्ये तोंडी वाटणीप्रमाणे वाटणीबाबतची नोंद घेतली असल्याचे नमुद आहे. सदर हिस्सेवाटणीत महादेव बापु हिंगवे यांच्या हिस्यात शेत सर्वे क्र. २०९, २१०/२ आराजी ८.७७ व २२९/१ख आराजी २.८६ ही शेतजमीन आल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे पुंडलिक हिंगवे यांच्या हिस्यात शेत सर्वे क्र. २०९, २१०/१ आराजी ८.७६ व शेत सर्वे क्र. २२९/१ क आराजी २.८७ ही शेतजमीन आल्याचे दिसुन येते.

१०. प्रतिवादी यांनी नि. क्र. २४ अन्वये दाखल केलेल्या दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता पुंडलिकराव हिंगवे यांनी त्याच्या हिस्यात आलेला शेत सर्वे क्र. २२९/१ आराजी २.८७ पैकी दि. ०१.०४.१९६४ रोजीच्या विक्रीपत्राप्रमाणे २.०० हेक्टर आर व दि. २०.०४.१९७६ च्या विक्री पत्राप्रमाणे उर्वरित ०.८७ हेक्टर आर ही शेतजमीन मय्यत महादेव हिंगवे यांना विक्री केली असल्याचे दिसुन येते. सदर दोन्ही विक्रीपत्रात विक्रीचे कारण वाहण्यास परवडत नसल्यामुळे व दुस-या कास्तकाराची उस्तवारी करण्याकरीता रक्कमेची जरुरीमुळे विक्रीपत्र करुन देत असल्याचे नमुद आहे. सदर दोन्ही शेतजमीनी महादेव हिंगवे यांनी विक्रीची रक्कम देवून खरेदी केली असल्याचे दिसुन येते. त्यात कुठेही पुंडलिक हिंगवे यांच्यासोबत अदलाबदली करुन शेतजमीनी घेतल्याचे दिसुन येत नाही. वादी किंवा प्रतिवादी यांचे तसे कथन देखिल नाही. पुढे महादेव हिंगवे यांनी हरीभाउ पठाळे व मधुकर पठाळे यांच्याकडुन शेत सर्वे क्र. २१३/१, २२९/२ आराजी ५.३५ ही शेतजमीन विकत घेतली असल्याचे दिसुन येते. सदर विक्रीपत्रात विक्रीचे कारण म्हणून महादेव हिंगवे यांचे शेत विकत

घेण्याकरीता हरीभाउ पठाळे व इतर यांनी त्यांचे शेत महादेव हिंगवे यांना विकले असे नमुद केले आहे. परंतु सदर शेतजमीनीच्या बदल्यात महादेव हिंगवे यांनी त्यांची कोणती शेतजमीन विक्री केली याबाबत काहीही नमुद केलेले नाही.

११. वादीने दाखल केलेला रिनंबरींग पर्चाचे अवलोकन केले असता बंदोबस्ताप्रमाणे शेत सर्वे क्र. २२९/१, २१३/१, २२९/२ हया शेतजमीनींचा पुनर्मोजणी प्रमाणे शेत सर्वे क्र. ४३६/२ असा आहे. त्यामुळे मय्यत महादेव यांनी पुंडलिक हिंगवे व हरीभाउ पठाळे यांच्याकडून खरेदी केलेल्या शेतजमीनींना पुर्नमोजणी प्रमाणे शेत सर्वे क्र. ४३६/२ असा देण्यात आल्याचे दिसुन येते. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी बयाणात शेत सर्वे क्र. ३९४, ४३६/२ हया वडीलोपार्जित शेतजमीनी असल्याचे मान्य केले आहे. प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे महादेव हिंगवे यांनी वडीलोपार्जित शेतजमीनीतील तोंडी वाटणी करुन शेत सर्वे क्र. ३९४ व शेत सर्वे क्र. ४३६/२ हया शेतजमीनी वादी क्र. १ व २ यांच्या ताब्यात दिले आहेत.

१२. रिनंबरींग पर्चाचे अवलोकन केले असता बंदोबस्ताप्रमाणे शेत सर्वे क्र. २०९, २१०, २३० पैकी शेतजमीनींना पुर्नमोजणी प्रमाणे शेत सर्वे क्र. ३९९ देण्यात आले. वादीने दाखल केलेल्या अधिकार अभिलेख पंजीचे अवलोकन केले असता मय्यत महादेव हिंगवे यांच्या हिस्यात शेत सर्वे क्र. २०९, २१०/२ व २२९/१ ख ही शेतजमीन आली असल्याचे दिसुन येते. रिनंबरींग पर्चाप्रमाणे २०९, २१० हया शेतजमीनींना पुर्नरमोजणी प्रमाणे शेत सर्वे क्र. ३९९ असे देण्यात आल्याचे दिसुन येते. त्यामुळे नवीन शेत सर्वे क्र. ३९९ हे मय्यत महादेव हिंगवे यांना हिस्सेवाटणीत मिळाले असल्यामुळे वडीलोपार्जित शेतजमीन असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

१३. रिनंबरींग पर्चाचे अवलोकन केले असता बंदोबस्ताप्रमाणे शेत सर्वे क्र. २०८, २३० पैकी यांना पुर्नमोजणी प्रमाणे शेत सर्वे क्र. ४३२ देण्यात आल्याचे दिसुन येते. शेत सर्वे क्र. २०८, २३० (बंदोबस्ताप्रमाणे), ४३२ (पुर्नमोजणी प्रमाणे) ही शेतजमीन वडीलोपार्जित असल्याचे किंवा महादेव हिंगवे यांनी स्वत च्या कमाईतून खरेदी केली असल्याचे वादीने किंवा प्रतिवादीने कोणतेही दस्ताऐवज दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरची शेतजमीन

वडीलोपार्जित आहे किंवा महादेव हिंगवे यांचे स्वकष्टार्जीत शेतजमीन आहे हे सद्यस्थितीत निश्चीतपणे सांगता येणार नाही. ते दोन्ही पक्षाच्या पूराव्यानंतरच सिध्द होवू शकेल.

१४. वरील सर्व विवेचनावरुन शेत सर्वे क्र. ३९४ व ४३६/२ हया वडीलोपार्जित शेतजमीनी असल्याचे दोन्ही पक्षांना मान्य आहे. त्याचप्रमाणे शेत सर्वे क्र. ३९९ ही शेतजमीन मय्यत महादेव हिंगवे यांना भाउ हिस्सेवाटणीत मिळाली असल्याने ती शेतजमीन वडीलोपार्जित शेतजमीन असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. मय्यत महादेव हिंगवे यांच्या मृत्यूपत्राव्दारे शेत सर्वे क्र. ३९९ हे शेत प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावाने करण्यात आले असल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. शेत सर्वे क्र. ३९९ हे शेत वडीलोपार्जित असल्यास सदरची शेतजमीन मृत्यूपत्राव्दारे हस्तांतरीत करण्याचा महादेव हिंगवे यांना निश्चीतच अधिकार नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने असल्याचे स्पष्ट होते.

१५. वादीच्या कथनाप्रमाणे वादातील शेतजमीन हया वडीलोपार्जित असून देखील वादींच्या आक्षेपाला न जूमानता प्रतिवादी क्र. १ ते ३ च्या दबावाखाली महसुल अधिका-यांनी बेकायदेशीर नोंद केल्या व त्याआधारावर प्रतिवादी क्र. १ ते ३ हे शेत क्र. ४३२ व ३९९ ची बेकायदेशीरपणे विल्हेवाट करण्याच्या तयारीत आहेत. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी बयाणात वादींचे आक्षेप रद्द करुन शेत सर्वे क्र. ३९९ च्या शेतजमीनीच्या अभिलेखावर माननीय तहसिलदार कारंजा, यांच्या आदेशावरुन प्रतिवादींच्या नावाची नोंद घेण्यात आली असे नमुद केले आहे. अभिलेखावरील दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता वादातील शेतजमीन हया मय्यत महादेव हिंगवे यांचे नाव सातबा-यावर लिहून होते व त्यांनी तथाकथीत बक्षीसपत्र व मृत्यूपत्र करुन दिल्यानंतर शेत सर्वे क्र. ४३२ चा सातबारा उता-यावर वामन व विठ्ठल यांचे नाव नोंदविण्यात आले. तसेच शेत सर्वे क्र. ३९९ च्या सातबारा उता-यावर प्रतिवादी क्रमांक ३ मनोज हिंगवे यांचे नाव नोंद असल्याचे दिसुन येते. अशापरिस्थीतीत सदर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशापरिस्थीतीत तात्परता मनाई हुकुम वादीच्या हक्कात पारित न केल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होवू शकते.

१६. वादीच्या कथनाप्रमाणे शेत सर्वे क्र. ४३६/२ व ३९४ या दोन्ही शेतजमीनी वादींच्या ताब्यात आहे. त्याचप्रमाणे शेत सर्वे क्र. ४३२ ही शेतजमीन प्रतिवादी क्र. १ व २

तसेच शेत सर्वे क्र. ३९९ ही शेतजमीन प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावाने महसुल अभिलेखात नोंद आहे. त्यामुळे सदरच्या शेतजमीनी हया प्रतिवादीच्या ताब्यात असून ते सदर शेतजमीनीचा उपभोग घेत आहेत. अशापरिस्थीतीत प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई हुकुम पारित केल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सोयीचे पारडे हे वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता**

१७. एकंदरीत वरील विवेचनावरुन सकृतदर्शनी केस ही वादीच्या बाजुने आहे. वादातील शेतजमीनी हया वडीलोपार्जित असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. त्यामुळे तात्पुरता मनाई हुकुम पारित न केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार हे वादीने सिध्द केले आहे. तसेच सोयीचे पारडे देखील वादीच्या बाजुने आहे वादीने सिध्द केले आहे. अशा परिस्थितीत वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकुम पारित करणे योग्य होईल. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांनी दाव्यातील शेतीमालमत्तेचे हस्तांतरण करु नये, विल्हेवाट लावू नये किंवा त्रयस्त पक्षाचा अधिकार स्थापीत करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम पारित करण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

Manjusha Manikrao Alone
Digitally signed by Manjusha Manikrao Alone
Date: 2020.11.30 13:57:58 +0530

कारंजा घा. (मंजुषा एम. अलोणे)

दि. २७.११.२०२० दिवाणी व फौजदारी न्यायाधीश,

कारंजा घा.